संशोधन आराखडा

मुखेड व परिसरातील मठ संस्थान व मंदिर स्थापत्याचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी

सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

संशोधक

वडजे जयराज पांडुरंग

एम.ए (इतिहास,समाजशास्त्र) बी.एड.एम.फिल.

मार्गदर्शक

डॉ.अनिल कठारे

एम.ए.(सुवर्णपदक) एम.फिल.पीएच.डी.

प्राध्यापक व संचालक, इतिहास विभाग प्रमुख

पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र

श्री शिवाजी कॉलेज कंधार

ता.कंधार जि.नांदेड

मार्च-२०१६

मुखेड व परिसरातील मठ संस्थान व मंदिर स्थापत्याचा अभ्यास

मराठवाडा हा महाराष्ट्र राज्याचा एक प्रादेशिक आणि प्रशासकीय विभाग आहे. या विभागात औरंगाबाद,बीड,उस्मानाबाद,परभणी,नांदेड, जालना, लातूर व हिंगोली हे आठ जिल्हे असून त्यामध्ये ७६ तालुके आहेत. नांदेड जिल्हयात नांदेड,किनवट,हदगाव,भोकर,कंधार ,बिलोली, मुखेड,देगलूर,लोहा, मुदखेड,हिमायतनगर, माहूर, धर्माबाद,उमरी, नायगाव (खैरगाव) व अर्धापूर असे एकूण सोळा (१६) तालूके आहेत. मुखेड हे तालुक्याचे ठिकाण नांदेड पासून दक्षिणेस ७५ कि.मी.अंतरावर आहे.मुखेड तालुक्यात १५२महसूली गावे आहेत. २०११ च्या जनगणनेनूसार मुखेड शहराची लोकसंख्या २७,६५० इतकी आहे. मुखेड हे प्राचीन शहर असून या शहरास फार मोठा सांस्कृतिक इतिहासाचा वारसा मिळालेला आहे. मुखेड शहर व परिसरात मोठया प्रमाणात पुरातत्वीय अवशेष पहावयास मिळतात. त्यामध्ये मंदिर स्थापत्य,मुर्तिशिल्प,शिलालेख, सतीशिळा आणि लौकिक स्थापत्याचा समावेश होतो. प्रस्तूत शोध प्रबंधात मुखेड शहर व परिसरातील बा-हाळी,मुक्रामाबाद,जाहूर,पाळा, व एकलारा येथील मंदिर स्थापत्य व मुर्तिशिल्पाचा अभ्यास केला जाईल. तसेच मुखेड व परिसरातील येवती,बेटमोगरा व बिल्लाळी येथील मठ संस्थानाचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तूत शोध प्रबंधात मुखेडपासून साधारणपणे ४५ कि.मी. अंतरावरील ऐतिहासिक ठिकाणे असलेल्या मठ संस्थान व मंदिर स्थापत्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

विषयाची निवड

नांदेड जिल्हायातील तालुक्याचे मुख्यालय असलेले मुखेड हे शहर प्राचीन आहे. या शहरास प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा महान वारसा मिळालेला आहे. या शहरास पुरातत्वीय दृष्टया अत्यंत महत्व आहे. या शहरास आणि परिसरात मोठया प्रमाणात पुरातत्वीय अवशेष आढळतात. या पुरातत्वीय अवशेषामध्ये मंदिर स्थापत्य,मूर्तिशिल्प,शिलालेख,सतीशिळा व लौकीक स्थापत्य इ.चा समावेश होतो. प्राचीन काळात मुखेड शहरात अनेक मंदिरे बांधली गेली होती. पंरतू त्यातील कांही मंदिरे आज उद्वस्त झालेली आढळतात. या मंदिराच्या बाहयभिंतीवर व स्तंभावर कोरीव नक्षीकाम व मुर्तिशिल्प मोठया प्रमाणावर केलेले आढळते. याचे सर्व अवशेष आजही आपल्याला या ठिकाणी पहावयास मिळतात. तसेच शिलालेख,सतीशिळा, व लौकीक स्थापत्य पहावयास मिळतात. या सर्व पुरातत्वीय अवशेषाचा अभ्यास करणे आणि त्यावर संशोधन होणे आवश्यक आहे. या संशोधन आणि अभ्यासामुळे मुखेड व परिसराच्या सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश पडणार आहे. तसेच मुखेड येथील गणाचार्य महाराज मठ संस्थान, येवती येथील नराश्याम महाराज मठ संस्थान, बेटमोगरा येथील शिवलिंग बादशहा मठ संस्थान व बिल्लाळी येथील महानुभाव पंथीय मठ संस्थान इ.मठ संस्थान आहेत. या मठ संस्थानाच्या इतिहासावर प्रकाश पडणार आहे. यासाठीच 'मुखेड व परिसरातील मठ संस्थान व मंदिर स्थापत्याला अभ्यास' या विषयाची निवड केली आहे. मुखेड व परिसरातील मठ संस्थान व मंदिर स्थापत्यावर प्रकाश टाकणे हाच विषय निवडीचा उद्देश आणि प्रयोजन आहे.

संशोधनाची उद्दिष्टये

i) मुखेड व परिसराच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकणे.
ii) मुखेड व परिसराच्या राजकीय इतिहासावर प्रकाश टाकणे.
iii) मुखेड व परिसरातील मठ संस्थानाच्या आढावा घेणे.
iv) मुखेड व परिसरातील मंदिर स्थापत्याचा आढावा घेणे.
v) मुखेड व परिसरातील हिन्दू,जैन आणि बौध्द मूर्तिशिल्पांचा आढावा घेणै.
vi) मुखेड व परिसरातील शिलालेख व सतीशिळांचा अभ्यास करणे.
vii) मुखेड व परिसराचे धार्मिक महत्व स्पष्ट करणे.
viii) मुखेड व परिसराचे सांस्कृतिक महत्व स्पष्ट करणे.
ix) मुखेड व परिसरातील लौकीक स्थापत्याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये

i) मुखेड हे शहर प्राचीन आहे.
ii) मुखेड शहर व परिसरास प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा महान वारसा लाभला आहे.
iii) मुखेड शहर व परिसरात हिन्दू मंदिर स्थापत्य आढळतात.
iv) मुखेड शहरात जैन व बौध्द मंदिर स्थापत्य आढळतात.
v) मुखेड शहर व परिसरात हिन्दू,जैन व बौध्द मूर्तिशिल्पावशेष आढळतात.
vi) हिन्दू मंदिर स्थापत्य व मूर्तिशिल्पाच्या तुलनेत जैन मंदिर स्थापत्यव मूर्ति शिल्प तसेच बौध्द धर्मीय मंदिर स्थापत्य व मूर्तिशिल्प फार कमी प्रमाणात आढळते.
vii) मुखेड व परिसरात मठ संस्थान आहेत.
viii) मुखेड व परिसरात शिलालेख व सतीशिळा आढळतात.
ix) मुखेड व परिसरात सातवाहन,वाकाटक,चालुक्य,राष्ट्रकूट,यादव,बहामणी आणि हैद्राबादच्या निजामाने राज्य केले आहे.
x) मुखेड व परिसरास सांस्कृतिक दृष्टया महत्वाचे स्थान आहे.

संशोधन पद्धती

'मूखेड व परिसरातील मठसंस्थान व मंदिर स्थापत्याचा अभ्यास' या विषयावरील संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धती आणि संदर्भ संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. मुखेड शहर आणि परिसरातील परिसरात असलेल्या प्राचीन मंदिरांचे,मूर्तीशिल्पांचे शिलालेख व सतीशिळा आणि लौकीक कला स्थापत्यांचे सर्वेक्षण केले जाईल.या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशोधन कार्य केले जाईल. तसेच मठ संस्थानाचा अभ्यास करताना सर्वेक्षण संशोधन पद्धती त मुलाखत पद्धतीचा वापर करुन संशोधन कार्य केले जाईल. तसेच प्रस्तूत विषयाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचाही वापर केला जाईल.

संशोधन साहित्याचा आढावा

'मुखेड व परिसरातील मठ संस्थान व मंदिर स्थापत्याचा अभ्यास' या विषयावरील संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धती व संदर्भ संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार आहे. प्रस्तूत विषयाच्या संशोधनासाठी प्रामुख्याने सर्वेक्षणातून व मुलाखतीतून मिळालेली माहीती महत्वाची ठरणार आहे. याशिवाय संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा, अनेक संदर्भ ग्रंथाचाही वापर केला जाणार आहे. यामध्ये प्राथमिक व दुय्यम संदर्भ ग्रंथाचा समावेश होतो.

मी माझ्या शोध प्रबंधाची मांडणी पुढील सहा (०६) प्रकरणात करणार आहे.

प्रकरण पहिले

पार्श्वभूमी

'पार्श्वभूमी' हे शोध प्रबंधातील पहिले प्रकरण आहे. या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधन विषयाची निवड,संशोधनाची उद्दिष्टे,संशोधनाची गृहितेकृत्ये, संशोधन पद्धती,संशोधन पद्धती अभ्यासाचे महत्व,संशोधनाची व्याप्ती व मर्यादा,संशोधन साहित्याचा आढावा आणि मुखेड शहर व परिसरातील प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकला जाईल.

प्रकरण दुसरे

ऐतिहासिक वाटचाल

'ऐतिहासिक वाटचाल' हे शोध प्रबंधातील दुसरे प्रकरण आहे. या प्रकरणात मुखेड व परिसराचा राजकीय इतिहास म्हणजेच ऐतिहासिक वाटचालीवर प्रकाश टाकला जाईल. मुखेड हे प्राचीन शहर आहे. सातवाहन कालखंडापासून या शहराचा व परिसराचा राजकीय इतिहास रेखाटता येतो. या शहरावर सातवाहन,वाकाटक,बदामीचे चालुक्य,राष्ट्रकुट,कल्याणीचे चालूक्य,यादव,बहमणी,आदिलशाही,दिल्लीचे मोगल आणि हैद्राबादच्या निजाम घराण्याने राज्य केले आहे. या सर्व राजकीय इतिहासाचा आढावा ऐतिहासिक वाटचाल या प्रकरणातून घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे
मठ संस्थान

'मठ संस्थान' हे शोध प्रबंधातील तिसरे प्रकरण आहे. या प्रकरणात मुखेड व परिसरातील मठ संस्थानाचा आढावा घेण्यात येईल. गणाचार्य महाराज मठ संस्थान मुखेड,नराश्याम महाराज मठ संस्थान येवती,शिवलिंग बादशंहा मठ संस्थान बेटमोगरा,महानुभाव पंथीय मठ संस्थान,बिल्लाळी इ.मठ संस्थानाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे
मंदिर स्थापत्य

'मंदिर स्थापत्य' हे शोध प्रबंधातील चौथे प्रकरण आहे. या प्रकरणात मुखेड शहर व परिसरातील मंदिर स्थापत्याचा आढावा घेण्यात येईल. मुखेड शहरात अनेक प्राचीन मंदिरे आहेत. महादेव मंदिर,दशरेथेश्वर मंदिर,मल्लेश्वर मंदिर, विरेश्वर मंदिर,महादेव मंदिर,नागेश्वर मंदिर,गणेश मंदिर,विरभद्र मंदिर,शनि मंदिर,जैन मंदिर व बौध्द मंदिर इ. मंदिरे आहेत.

याशिवाय मुखेड परिसरातील बा-हाळी येथील शिवमंदिर,भवानी मंदिर व ब्रम्हदेवांचे मंदिर मुक्रमाबाद येथील खडकेश्वर मंदिर,जाहूर येथील सिध्देश्वर मंदिर, एकलारा येथील शिवमंदिर व विरभद्र मंदिर, पाळा येथील भवानी मंदिर, खानापूर येथील शिवमंदिर व तडखेल येथील शिव मंदिर इ.प्राचीन मंदिरे आहेत. ही सर्व मंदिरे कल्याणीच्या चालूक्य काळातील आहेत. या प्रकरणात मुखेड शहर व परिसरातील मंदिर स्थापत्याचा आढावा घेण्यात येईल. तसेच लौकीक स्थापत्यांचाही आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे
मूर्तिशिल्प

'मूर्तीशिल्प' हे शोध प्रबंधातील पाचवे प्रकरण आहे. या प्रकरणात मुखेड व परिसरातील मूर्तिशिल्पांचा आढावा घेण्यात येईल. मुखेड व परिसरात हिन्दू,जैन व बौध्द मूर्तीशिल्प आढळून येतात. हे मूर्तीशिल्प प्रामूख्याने राष्ट्रकुट आणि कल्याणीच्या चालूक्य काळातील आहेत. धार्मीक मूर्तिशिल्पा शिवाय लौकीक मुर्तिशिल्पही मुखेड व परिसरात मोठया प्रमाणात आढळते. याचाही आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण सहावे
उपसंहार

'उपसंहार' हे शोध प्रबंधातील सहावे व शेवटचे प्रकरण आहे. या प्रकरणात प्रस्तूत विषयाच्या संशोधन आणि अभ्यासातून निघालेला निष्कर्ष दिला जाईल. मी माझ्या शोध प्रबंधाची मांडणी वरील सहा प्रकरणात करणार आहे. तथापि हा केवळ संभाव्य संशोधन आराखडा आहे. संदर्भ साधनांच्या उपलब्धतेनुसार संशोधन आराखडयात, प्रकरणाच्या शिर्षकात आणि प्रकरणाच्या संख्येत बदल होऊ शकतो.

मार्गदर्शक

डॉ.अनिल कठारे

एम.ए.(सुवर्णपदक) एम.फिल.पीएच.डी.

प्राध्यापक व संचालक,इतिहास विभाग प्रमुख

पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र

श्री शिवाजी कॉलेज कंधार

ता.कंधार जि.नांदेड

संशोधक

वडजे जयराज पांडूरंग

एम.ए (इतिहास,समाजशास्त्र) बी.एड.एम.फिल.

वै.धुंडा महाराज देगलूरकर महा. देगलूर

ता.देगलूर जि.नांदेड